पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,सामान्य प्रशासन विभाग,
क्र: सा.प्र.वि/०२/कावि/४१८/२०२४
दिनांक : २५/०७/२०२४

विषय : अतिवृष्टीमुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहिर करणेबाबत...

आदेश,

ज्याअर्थी, प्रादेशिक हवामान विभागाच्या पूर्वसूचनेवरून जिल्ह्यातील त्या-त्या भागातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेवून, संपूर्ण जिल्ह्याकरिता अथवा जिल्ह्यातील स्थानिक क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी म्हणून मा.जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

त्याअर्थी, भारतीय हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार पुणे जिल्ह्याला अतिमुळसधार पावसाचा (रेड अलर्ट) इशारा देण्यात आलेला आहे. पुणे जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीमध्ये अतिवृष्टी होत आहे. त्याअनुषंगाने मा.जिल्हाधिकारी यांनी पुणे जिल्ह्यातील शाळा व महविद्यालये बंद ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. वरील सर्व बाबी विचारात घेता पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमांच्या शाळा आणि महाविद्यालये यांना आज दिनांक २५ जुलै, २०२४ रोजी सुट्टी जाहीर करणेत येत आहे. तसेच पुढील काही तासांत पावसाचा जोर वाढणार असल्याने नागरिकांनी सतर्क राहावे.

**मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने**

(विठ्ठल जोशी)
उपआयुक्त (सा.प्र.वि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति,
सर्व संबधित अधिकारी
सर्व संबधित विभाग

E:\desktop\mandhan gr\dhoran.docx